"नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास"
दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका

## डी. एन. नाडकर्णी विशेषांक

### समर्पित जीवनाचा अंत



७.१.१९३७ ते १८.१२.२०२५

॥ देव बरे करु ॥

| | | |
|---|---|---|
| क्रमांक १ | वर्ष : ४८ | एप्रिल – जून २०२६ |

**BOOK PACKET**

मूल्य रु. ५

Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80

**TO,**

**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.
**कार्यालय फोन :** ०२२ – ४७४९ ८२५९ / ९८६७६ ७४८६४
**WEB SITE : http://www.nkgsbsangh.org   E-MAIL : nkgsbs@gmail.com**
कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

# डी. एन्. नाडकर्णी यांचे फोटोज्



डी. एन. नाडकर्णी, प्रसाद कसबेकरांसमवेत ८७ व्या वाढदिवसाला त्यांना शाल भेट दिली तेव्हां

डी. एन. नाडकर्णी डॉ. आंसावरी भट यांची ओटी भरताना





डी. एन. नाडकर्णी त्यांचे जिवलग मित्र श्री. वागळे यांच्या बरोबर

डी. एन. नाडकर्णी वाढदिवसाचा केक कापतांना





डी. एन., गिरगांव ऑफिसमध्ये मृदुल भांडारकर, मारुती दळवी व शिरीष वाघ यांच्या बरोबर मिटींग मध्ये (वर्ष २०१६)

सदाशिवगड हायस्कूल मध्ये विद्यार्थी डी. एन. यांना श्रध्दांजली वाहतांना



## संपादकीय

# देव बरे करू

१८ डिसेंबर २०२५ रोजी रात्री २.३० वाजता माझे गुरु श्री. दत्तात्रय नागेश नाडकर्णी (ज्यांना प्रेमाने लोक 'डी. एन्.' म्हणून ओळखतात) यांचे वयाच्या ८९व्या वर्षी वृद्धोपकाळामुळे निधन झाले.

त्यांच्या निधनाचे वेळी जाने–मार्च'२६ची मुखपत्रिका प्रिंटिंगसाठी तयार होत होती ती छापता छापता त्यांच्यावर संपादकीय लेख लिहिला व तो एक पानी लेख सर्व मुखपत्रिकांमध्ये शेवटच्या क्षणी घालून सर्व ज्ञातिबांधवांना पोहोचता केला.

त्यांचे व्यक्तिमत्त्वच असे होते की वृत्तसंपादनातील कौशल्याचे एकेक आलेख ते पाहता पाहता सुचवित असत. त्या लेखात म्हटल्याप्रमाणे मनाची संकुचितता, कल्पनेचे दारिद्र्य, आर्थिक कृपणता त्यांना कधी मानवलीच नाही. त्यांच्यापाशी जे जे होते ते ते दोन्ही हाताने उधळून त्यांनी ज्ञातिबांधवांना दिले. सर्व ज्ञातिबांधवांवर त्यांनी प्रेमाचा वर्षाव केला. ''देव बरे करू'' हा त्यांचा प्रेमाचा संदेश मंत्र सर्वांसाठीच!

मुखपत्रिका हे त्यांचेच अपत्य. त्याचे रोप त्यांनी मायेने मोठे केले व हे त्रैमासिक ४५ वर्षे नित्यनियमाने जोपासले. आपले ज्ञातिबांधव मुखपत्रिका कधी येते याची नेहमी आतुरतेने वाट पहात असत! गेली ३ वर्षे त्यांच्या निवृत्तीनंतर हे मुखपत्र मी जरी चालवत असलो तरी ते असेपर्यंत, त्यांचा योग्य सल्ला घेऊनच मी पुढे जात असे.

त्यांनी गोरगरीब कुटुंबांसाठी स्वखर्चाने शेवटच्या क्षणापर्यंत मदत केली आहे. इतकेच नव्हे तर पुढेही त्यांच्या बँकेतील ठेवीमधून दर महिन्याला अनेक कुटुंबांना मदत मिळत रहावी, याची तजवीज केली आहे.

त्यांनी अपार मेहनतीने बनविलेली प्रत्येक Nkgsb कुटुंबाची संपूर्ण 'वंशावळ' आम्ही संघाच्या कचेरीत जपून ठेवली आहे तसेच त्यांच्या पुस्तकांचा संग्रह, सोबत त्यांची आठवण, तसेच पुढील पिढीसाठी अफाट प्रेरणा म्हणून ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.

आज मी पोरका झालो आहे. माझे गुरू आज हयात नाहीत. ते पंचतत्त्वात विलीन झाले आहेत. परंतु त्यांची शिकवण मी त्याच नेटाने पुढे चालवत ठेवण्याचा मनःपूर्वक प्रयत्न करीत राहीन व त्या अनुषंगाने ह्या वेळचे मुखपत्र मी 'डी. एन्. विशेषांक' म्हणून काढण्याचा प्रयत्न केला आहे. ह्या विशेषांकाद्वारे त्यांना आदरांजली देणे हे आपणा सर्वांचे परमकर्तव्यच आहे, असे मी मानतो.

– प्रसाद कसबेकर

एन्. के. जी. एस्. बी. संघ अध्यक्ष यांचा लेख

# माझ्या आठवणीतले डी. एन्

श्री. दत्तात्रय नागेश नाडकर्णी म्हणजेच आपले डी. एन्. ह्यांचे १८.१२.२०२५ रोजी दुःखद निधन झाले. मी २०१० साली संघकार्यकारीणीत येण्याआधीपासून माझा त्यांच्याशी संपर्क होता. ते पेशाने सिव्हील इंजिनीयर होते आणि मी कार्यरत असलेल्या प्रकल्पांसाठी त्यानी Foundation आणि Structural Designs पुरवली होती.

आपल्या ज्ञातीतील गरजू बांधवांना जास्तीत जास्त मदत मिळवून देण्यासाठी ते नेहमी प्रयत्नशील असत. प्रकृती अस्वास्थ्यामुळे आमच्या वार्षिक सभांना गेली ३ वर्षे ते हजर राहू शकले नाहीत. तरी संघाचा वार्षिक अहवाल वाचून त्यावर आपले निरीक्षण व टीका टिप्पणी ते पाठवून देत आणि त्यावर झालेल्या चर्चेविषयी माहिती करून घेत. माझ्या माहितीप्रमाणे जवळपास ४० वर्षे त्यानी एकही वार्षिक सभा चुकवली नाही. हा त्यांचा विक्रम कुणीही मोडू शकणार नाही. त्यांचे मराठी भाषेवर प्रभुत्व होते. मराठीबरोबर संस्कृत विषयातदेखील त्यांना रुची होती. आपल्या जातीतील प्रमुख आडनावाच्या परिवारातील सदस्याची नावे व इतर माहिती (Family Tree) संकलित करण्याचे कार्य त्यांनी केले.

त्यांचा जनसंपर्क दांडगा होता मुंबईला राहून देखील कारवार, सदाशिवगड येथे घडणाऱ्या सामाजिक-शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रमांची माहिती त्यांना असे. कोविड महामारीच्या काळात हालचालीवर निर्बंध असल्यामुळे संघ कचेरी बंद होती, तेव्हा त्यांनी स्वत:च्या खात्यातून पैसे वळते करून समाजसेवा व वृद्धसेवा लाभार्थींना पैसे पाठवण्याची व्यवस्था केली होती. शिवाय अडीअडचणीत असलेल्या आपल्या ज्ञातीतील कित्येकांना त्यानी स्वत:च्या खात्यातून आर्थिक मदत केल्याचीही उदाहरणे आहेत.

आपल्या समाजासाठी दिलेल्या त्यांच्या योगदानाची दखल घेऊन संघाने त्यांना २००४ सालाच्या स्नेहसंमेलनात माननीय सभासद (Honorary Member) म्हणून गौरवांकित केले होते. अलिकडे त्यांना ऐकू येत नसल्याने आम्ही मेसेजेसद्वारे संपर्कात होतो.
११ डिसेंबरला मी त्यांना प्रत्यक्ष भेटण्याची इच्छा व्यक्त केली असता आपल्याकडे पाहुणे येणार आहेत तेव्हा तू २० किंवा २१ डिसेंबरला ये असा त्यांचा निरोप आला..

परंतु नियतीच्या मनात काही वेगळे होते. १८ डिसेंबरला त्यांचे निधन झाल्याने आमची प्रत्यक्ष भेट होऊ शकली नाही ह्याची खंत वाटते. आपल्या निधनानंतर कुणीही जाहीर दुखवटा सभा घेऊ नयेत असा निरोप त्यांनी आपल्या मुलाजवळ ठेवला होता त्यामुळे मनात असून देखील आमचा नाईलाज झाला. समाजासाठी असे अमूल्य योगदान देताना अत्यंत साधेपणाने जीवन व्यतीत करणाऱ्या या कर्मयोग्याला माझे शतश: नमन!

-शिरीष दीनानाथ वाघ

एन्. के. जी. एस्. बी. संघ अध्यक्ष

## एज्युकेशन सोसायटी अध्यक्षांचा लेख

## The One And Only One
## Our 'DN'

When I joined the Ed. Society and The Sangh as a member of Mg. Committee in the year 2000, I knew about 'DN' through my seniors that he is doing a great job of publishing quarterly magazine Mukh Patrika imparting information about our community to all our community members.

Over a period of time, I observed that he always used to be at least 15 minutes before the start of Function; It can be either our AGM or Sneh -Sammelan or any other social gathering. He told me, if you respect your own time, time will respect you. What a golden thought.

He was very meticulous in his writing. It was not only gramatically correct and also to point so that there is no ambiguity in what he wanted to convey.

He was part of Sub-committee formed to amend the Sangh bye-Laws in the year 1992, and the Education Society Bye-Laws in the year 2003.

He was honoured as an Honourary member of The Education Society in the Sneh-Sammelan held on 23rd November 2014 at the hands of the Chief Guest of the function Dr. Suhas Pandurang Wagh (ENT Surgeon)

Late Shri Dattatrya Nagesh Nadkarni's (our 'DN's) dedication for the betterment of our community would always be a guiding light for me in the years to come.

**Devdas Nadkarni**

Chairman : Education & Industrial Society

डी. एन., इतक्या वर्षाचा आपला घनिष्ठ संबंध,
तुम्ही अचानक गेलात व मन सुन्न झाले.
श्री. मंगेश तुमच्या आत्म्यास सद्‌गति देवो !
**प्रेषक : कुणाल कंस्ट्रक्शन कंपनी**
– जितेंद्र वैती : मो. ९८३३६ ३६४५१

# In Loving Memory of Late Shri D. N. Nadkarni

Late Shri D. N. Nadkarni, was born on 7th January 1937 lived a life that never sought attention yet left a lasting imprint on me. He believed that a meaningful life is built on discipline, humility, and unwavering values. I had my best two memories with him- moments that continue to shine brightly in my heart.

One of the most touching memories I hold of him is the way he preserved our family history. He had carefully documented a family tree spanning two to three generations of my family i.e from my great-great-grandparents all the way to my daughter. To see generations connected so thoughtfully, was not only informative; it was emotionally connected moment. In that moment, history felt alive. It was a gentle reminder that remembering where we come from gives meaning to where we go.

Even after retirement, his dedication to community life never faded. For many years, he served as the editor (Sampadak) of Mukhapatrika, a quarterly publication that became a lifeline of collective memory for the NKGSB community of Karwar. Every birth, death, wedding, golden jubilee, educational milestone, and family update was recorded with care and precision. The information was not only detailed but beautifully organized, making the magazine informative, relatable, and deeply personal. More than a publication, it was a mirror of community life, curated with responsibility and love.

When I was elected as Chairperson of NKGSB Bank, I wished to meet him personally. Though his health did not permit much interaction, that meeting was unforgettable. I often called him the "encyclopedia of the NKGSB community," and rightly so. Even at the age of 85+, his memory was astonishingly sharp. Without referring to any book or record, he could recall names, relationships, and family connections of mine- explaining effortlessly I am who's grand daughter, or my aunt, uncle. Witnessing such clarity of mind at that age was humbling and inspiring.

Late Shri D. N. Nadkarni lived by example. He followed the path of righteousness without compromise, fulfilled his family and social responsibilities with sincerity, and believed deeply in hard work and honest conduct. His calm demeanour, patience, and equal treatment of all earned him quiet respect rather than loud praise to me.

Some lives are measured not by years, but by the depth of their impact. He was one of the example of it.

CA Himangee Nadkarni - Chairperson
NKGSB Co-op. Bank Ltd

## Tribute to Shri D N Nadkarni : DN a man with Societal Heart

Most of us are blessed with good qualities or skills, but only a few recognize and use them to become successful in life. DN was one of those exceptional people-genuinely multi-talented.

In his professional life, he was an accomplished structural engineer, working in a successful company and holding senior positions with great responsibility. He was also a skilled manager of people, which helped him lead a purposeful life. His strong mathematical abilities allowed him to solve complex engineering problems, and even after retirement, colleagues often sought his wise advice. He enjoyed solving math problems as a hobby, and my wife, a math teacher, often had deep conversations with him about fundamental topics. Sometimes, I would change the topic to sports just to join in, much like a child wanting attention.

He could talk about Cricket, Lawn Tennis, Badminton, and Chess like an expert, referring always about recent and older important matches. In his younger days, he was a keen spectator who visited stadiums, read many newspapers, and watched live TV event to follow many sports.

He was also very well-read, able to refer to Marathi literature, classical music, and other art forms with ease, and he enjoyed analyzing classical works.

DN loved meeting and helping people, especially if he found out you had Saraswat lineage.

He enjoyed traveling more so towards Goa and Karwar direction and rarely missed his daily walks, often covering the length and breadth of Vile Parle and Andheri, twice a day-mornings for errands and evenings for social connections. This kept him physically active and mentally fresh. Before mobile phones, his landline was like a community newspaper, quickly spreading news and helping people celebrate, mourn, or reflect together.

What made him truly unique was his ability to use his talents with both his mind and heart. He loved others deeply and celebrated their successes and small achievements as if he was a close family member. He made sure to support both those who wanted to give and those in need. He always stood up for fairness, facts, and principles, finding the best solutions for the community.

He never forgot his teachers, schoolmates, colleagues, or community institutions, feeling a deep responsibility toward them.

I personally received his love and affection in abundance. He would call or message me about important matches so I wouldn't miss them and would celebrate victories with me. He was interested in every small development in our family. He even made a family tree for eight generations, revealing relatives I didn't know existed. He was my guide for NKGSB Bank, always up to date and making suggestions for improvement. He checked our statutory and social compliance as a vigilant shareholder, attended every AGM and memorial lecture, and traveled with me to many events.

He always appreciated the bank staff and made good references for the bank. When there were challenges, he helped, I recall in a NKGSB Board election where Mr. Suresh Borkar (another stalwart of our community) ran independently, DN supported him and actively canvassed for him. Even after a narrow loss, DN returned to being a well-wisher, showing us in life how one should to take a stand on principles that he did not wish to compromise and then post the event independent of the outcome move forward for the community's good. That was a practical lesson for me.

His work as Editor of Mukhapatrika was a highlight of his life. He kept the community connected, included many people, and helped those in need. His writings showed his deep gratitude and golden heart.

When he fell ill, I met him a few times. Even after losing his voice, he messaged me on WhatsApp. Though he was not the same physically, he never lost his sense of purpose for society. That perseverance was inspiring.

When I received the call about his passing, I was about to leave for an important meeting and could not pay my last respects in person. This will be a regret for the rest of my life.

He has left a void that will not be easy to fill. Still, as he wanted, life must go on, and we should learn from the best of what he showed us through his purposeful life. In today's busy world, he made us think about our life's purpose and guided us by example. As he would always say in Konkani, may God bless us all (Dev thuje barekaro). We will miss him always.

**- Mahesh Aras**

## श्री. दत्तात्रेय नागेश नाडकर्णी

श्री. दत्तात्रेय नागेश नाडकर्णी यांचे दिनांक १८/१२/२०२५ रोजी निधन झाले. ते माझ्या विलेपार्ले पूर्व येथील घराजवळ राहत असत. माझे मित्र श्री. अजित रेगे यांच्यामुळे ती दुखद बातमी मला कळाली.. मी जेव्हा त्यांच्या घरी पोहोचलो तर त्यांचे घर, त्यांचे नातेवाईक व चाहत्यांनी भरून गेले होते त्यावरून त्यांची लोकप्रियता लक्षात येते. त्यांना मी अतिशय भावपूर्ण श्रद्धांजली वाहतो.

ते माझ्या मोठ्या बंधूसारखे होते माझी मोठी बहीण सरोज नाडकर्णी जी सध्या अमेरिकेत वास्तव्यास आहे. त्यांचा जन्म व माझ्या बहिणीचा जन्म एकाच दिवशी एकाच वर्षात ७ जानेवारी १९३७ चा आहे. ती दोघेही हिंदू हायस्कूल कारवार या शाळेत एकाच वर्गात एस.एस.सी.पर्यंत शिकायला होते. मी त्यांच्यापेक्षा लहान असल्यामुळे ते आमचे आदर्श होते. ए.सी.सी.ला जे पाच टॉपर होते त्यात डी एन बरोबर माझ्या बहिणीचेही नाव होते. १९५१ साली कारवार येथे मराठी साहित्यसंमेलन भरले होते ते भरवण्यामध्ये त्यांचा मोठा पुढाकार व सहभाग होता. त्यांना आम्ही सहकार्य केले होते. अनेक मान्यवर साहित्यिक आणि लेखक यांचा त्यात सहभाग होता. श्री आचार्य अत्रे, श्री कणेकर, श्रीमती संजीवनी मराठे, श्री. ना. ग. गोरे, श्री एस. एम. जोशी, सेनापती बापट, इत्यादींचा सहभाग होता. या संमेलनाची सर्व नियोजन व्यवस्था यात श्री. डी. एन. नाडकर्णी यांचा मोठा वाटा होता.

त्यामुळे ते नावारूपास आले होते.

१९५६ साली भाषावार प्रांत रचनेनुसार कारवार-बेळगाव कर्नाटकात समाविष्ट करण्यात आले. त्यावेळी माझे वडील श्री. दिगंबर म. कुळकर्णी (ॲडव्होकेट) हे महाराष्ट्र एकीकरण समितीचे कारवारचे अध्यक्ष होते. त्यांनी कारवार, बेळगाव महाराष्ट्रात येण्यासाठी मोठी चळवळ कारवारात चालू केली त्या चळवळीत कारवारच्या लोकांबरोबर त्यांच्या बहिणी सुधा आणि शीला ह्यांनीही भाग घेतला होता. १९५३ साली डी एन बहुतेक पुढील शिक्षणासाठी मुबईला आले असावेत.

NKGSB संघाची गेली जवळ जवळ सहा शतके यात त्यांची सांस्कृतिक व सामाजिक बांधिलकी होती. संघाची मुखपत्रिका ही त्यांचीच प्रेरणा होती, मुखपत्रिका आणि डी एन यांचे समीकरण होते. मुखपत्रिकेच्या रचना घाटणी व लेखांवर डी एन यांचा ठसा होता. मी असे ऐकले आहे की मुखपत्रिकेचे सध्याचे संपादक श्री. प्रसाद कसबेकर हेसुद्धा अत्यंत कुशलतेने डी एन नाडकर्णींच्या पद्धतीनेच मुखपत्रिकेचे काम करीत आहेत. तेसुद्धा डी एन च्या अखेरपर्यंत Approval शिवाय मुखपत्रिका प्रकाशित करत नव्हते.

त्यांचा ग्रंथसंग्रह ही अत्यंत समृद्ध आहे. कारवारचा इतिहास आणि भूगोल तसेच जीएसबी सामाजातील चालीरीती आणि खाद्यप्रकारावर आधारित बरीच पुस्तके त्यात आहेत त्यांनी हा वारसा कोणाकडे दिला आहे ते माहीत नाही.

मी NKGSB बँकेत चेअरमन असताना शताब्दी महोत्सवानिमित्तची इतिहास व सेलिब्रेशन कमिटी नेमली होती त्यात डी एन नाडकर्णी हे ही त्या कमिटीत होते. बँकेच्या स्मरणिकेमध्ये त्याची रचना, मांडणी आणि लेखामध्ये डी एन चे मोठे योगदान आहे. त्यांच्या आठवणी बऱ्याच आहेत, पण मी इथेच थांबतो.

श्री. दत्तात्रेय नागेश नाडकर्णी (डी. एन.) यांच्या चरणी हि आदरांजली वाहतो त्यांच्या पवित्र आत्म्यास सद्‌गती मिळो, ही श्री. शांतादुर्गा व श्री. मंगेश ह्यांच्या चरणी प्रार्थना करतो.

**किशोर डी कुळकर्णी** – Ex - Director, Finance HRD, BSES/ Reliance Energy &
M : 9322218579 Vice-Chairman & Chairman, NKGSB Bank Ltd.

## नॉर्थ कॅनरा जी.एस.बी.
## समाजाचा आधारवड हरपला

गुरुवार, दिनांक १८ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी डी. एन. नाडकर्णी यांच्या निधनाची बातमी कळली. १९९५ सालापासून कारवारी GSB समाजात माझी entry झाली. संघाचे अध्यक्ष AP आणिक PS ह्या दोघांना मी ओळखू लागलो होतो.

ऑगस्ट १९९६ साली ठाणे मंच स्थापन झाला. स्थापनेच्या एक महिना आधी, एके दिवशी, संघ ऑफिसात मला बोलविण्यात आले होते तेथे GB आणि DN ह्यांची ओळख झाली.

सुरुवातीस, मुखपत्रिकेचे संपादक अशी ओळख झाली खरी, पण त्यानंतर त्यांच्या अफाट कार्याची जाणीव होऊ लागल्यानंतर त्यांच्याबद्दल मनात एक आदर निर्माण झाला. मी गोंयकार असल्याने, प्रत्येक भेटीत गोयकारांच्या कोकणीतले शब्द वापरून ते माझे मनोरंजन करीत असत.

अनेक विषयांवर त्यांचे मार्गदर्शन मिळाले. आज ठाणे मंचाच्या यशस्वी वाटचालीत डी. एनचा महत्त्वाचा वाटा आहे असे मी म्हणेन. घरी गेल्यावर ते त्यांचा कपाटात विविध विषयांवर साठविलेला संदर्भ ठेवा दाखवित हे काम खरोखरच कौतुकास्पद होते.

आपले सुविद्य मुखपत्रिका संपादक श्री. प्रसाद कसबेकर यांनी, डी. एन यांच्या निधनानंतर त्यांच्या कपाटातला संदर्भ ठेवा त्यांच्याकडून स्वत:च्या ताब्यात घेऊन संघ ऑफिसात आणून ठेवला. हे खरोखरच प्रशंसनीय कार्य आहे.

एक उत्कृष्ट नेत्रृत्व आणि प्रेरणास्रोत आपल्यातून हरवले आहे. आता फक्त राहतील आठवणी.

**सुरेश पालेकर,** (उपाध्यक्ष)
ठाणे मंच (८९२८८५०१९३)

मुखपत्रिकेचे जनक श्री. डी. एन. नाडकर्णी
यांना अत्यंत भावपूर्ण श्रध्दांजली
ईश्वर तुमच्या आत्म्यास शांती देवो !
प्रेषक : **मांगसिध्देश इनवेस्टमेंटस् प्रा. लि.**
श्री. प्रणव मुजुमदार
फोन : ०२२ - ६९७३९९००

## Remembering D N Nadkarni

Pradeep and DN worked in Norwegian engineering company, Aker Solutions.

He was respected for his knowledge. We started working voluntarily in Nkgsb Sangh & also Education Society for more than 11 years. DN guided us and encouraged me to compere for Sammelan. His outreach to community was wide, from Dandeli to USA. This helped him to bring funds to our institutions for vriddha sewa, medical etc.

He knew the samaj had now spread out world over and visioned that Census of Samaj needed to be done. He initiated that Computerisation of Census data be done, which was completed by Pradeep and me, after filing was done.

He made family trees (geneology) of families, travelled to Kashi, Rameshwaram to collect data, from his own expenses. He charged nominal fee for that.

He wanted the mukhapatrika to run smoothly later on. He asked me to join, but my limited marathi made it impossible. He got fresh, dedicated persons and handed mukhapatrika over for future generations.

His interest in sanskrit pathantar, khadya melawa was keen. He was the Hon. member of the institution. He would pamper us with 'kharvas' on visiting him.

He was smiling, open-minded, pleasant personality. He will be missed by all those who knew him. His memories will live on, the work he did for samaj will be his good karma.

A great Karmayogi and a visionary!

**Pradeep and Prachi Desai**
(8691827597)

ओम शांति !
डी. एन. तुम्ही गेलात व एक कधीच भरुन न
येणारी पोकळी **G.S.B.** ज्ञातिबंधवांमध्ये
निर्माण झाली आहे. ओम शांति !
प्रेषक:'' **सर्व प्रथम सेवा "SERVICE FIRST"**
श्री. जोशी – मोबा. : ९८१९३०४५९९

## My Schoolmate D. N. - The allrounder

The thought of DN conjures up an image of his smiling face and decades of his dedication to the success of Mukhapatrika. With changing times, he was attentive to the forward needs of our community, and shaped Mukhapatrika to fit those needs of the times. He enhanced Mukhapatrika with his unique attributes.

He was a keen student of the historical passage of our community and took every opportunity to collect and preserve the nuggets of precious information from our elders. He painstakingly collected old photographic records, and articles and presented them to the readers. It really takes a special person like DN to be able to do such things.

I got to know DN in the 50's when we both studied at Hindu High School, Karwar. Little did I know then of his latent multifaceted talent. Looking back on him, to my mind, he was a reporter, a historian, a forward thinker and a great editor, all rolled into one DN !

I will always cherish the memories of our long friendship and will ever remain grateful for your long, selfless service to our community.

- Dattatraya (Chandrakant) Bhende (USA)

=:=:=:=:

**डी. एन. हे माझे जवळचे मित्र होते. त्यांच्या संघातील कार्यात**
**त्यांनी शेवटपर्यंत स्वत:ला वाहून घेतले.**
GSB Community **चा ते हीराच जणू !**
**त्यांच्या निधनाने ज्ञातीतील एक सच्चा कार्यकर्ता हरपला.**
**ओम शांती शांती शांती :**
**प्रेषक : विनोवर कॅटरर्स, ( विनोद कंवल)**
**मोबा. : ९८२०८ ४३३९२**

## एक खळाळते चैतन्य हरपले!

डिसेंबर महिन्यातला गुरुवार धुरकट धुक्यात उगवला. चला, कालची १७ तारीख संपून आजच्या १८ तारखेला सुरुवात झाली. असा विचार, वयोमानानुसार मनात येतो काय, इतक्यात फोन वाजला. ''अत्यंत वाईट बातमी म्हणजे आपले डी. एन्. नाडकर्णी रात्री दोनच्या सुमारास गेले.'' आमगेलो डी. एन्. नाडकर्णी गेलो गो.'' बस्स! एवढे शब्द ऐकताच आजच्या उदासवाण्या धुरकट धुक्याचे कारण समजले. लखलखता प्रकाश लोपला.

आपल्या ज्ञातीच्या इतिहासाचा, वंशावळीचा, प्रत्येक कुटुंबाच्या सखोल माहितीचा चालता बोलता ज्ञानकोश म्हणजे डी. एन्. (दत्तात्रय हे पाळण्यातले नाव असून आपल्या ज्ञातीत ते डी एन्. या नावानेच ओळखले जातात.) काया-वाचा-मने समाजकार्याला वाहून घेतलेली व्यक्ती म्हणजे डी.एन्. सगळ्या जबाबदाऱ्या, सगळे व्याप सांभाळून काव्य, शास्त्र, विनोदात, साहित्यात रमणारे डी. एन्. या सगळ्या गोष्टी एकवटून आल्या आणि त्यांनी आपल्या कारवारकरांच्या मुखपत्रिकेला जन्म दिला. तिच्या संपादकत्वाची धुरा तब्बल साडेचार दशके म्हणजे पंचेचाळीस वर्षे अगदी अखंडितपणे वाहिली. काही वर्षे पुण्यात बदली झाल्यावरसुद्धा पुणे-मुंबई येरझारा करीत. केवळ कर्तव्यबुद्धीनेच नव्हे तर अपत्यावरच्या मायेने, काळजीने. या इवल्याशा चणीच्या त्रैमासिक मुखपत्रिकने काय काय म्हणून केले नाही? आपल्या देशातल्या परदेशातल्या सर्व ज्ञातिबांधवांना खऱ्या अर्थाने एकत्र बांधले, ते मुखपत्रिकारूपी सूत्राने. इतकेच नव्हे तर नवख्या पण हौशा आणि गवशा, लेखक-लेखिकांना आग्रहाने लिहिते केले. त्यांच्या लिखाणाचे स्वतः कौतुक करून त्यांचा आत्मविश्वास वाढवला. त्यांनी स्वत: लिहिलेल्या संपादकीयातून, तसेच तज्ज्ञांच्या लेखातून सर्वांना मार्गदर्शन लाभले. मुखपत्रिकेने ज्ञातिबांधवांच्या कर्तबगारीचे, कर्तृत्वाचे कौतुक कटुंबातल्या वडीलधाऱ्याच्या मायेने केले आहे, आणि करीत आहे. ज्ञातीचा इत्थंभूत वृत्तांत मुखपत्रिकेत पहायला मिळतो.

वयोमानानुसार आपल्या तब्येतीच्या मर्यादा लक्षात येताच त्यांनी श्री. प्रसाद (पंकज) कसबेकरांचे हुन्नर आणि उत्साह पाहून मुखपत्रिकेच्या संपादकत्वाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली. एवढ्यावर न थांबता अगदी अखेरच्या श्वासापर्यंत शेवटची तीन वर्षे त्यांना मार्गदर्शन करीत राहिले. त्यांचे शिष्यत्व स्वीकारलेल्या प्रसाद कसबेकरांनी त्याचे सार्थक

केले. निष्ठेने त्यांचे कार्य पुढे सारत राहिले. आताच पहा ना. मुखपत्रिकेची छपाई झाल्यावरसुद्धा अगदी आयत्यावेळी अत्यंत दाटून आलेल्या शब्दात त्यांना श्रद्धांजली वाहिली. समयसूचकतेने एका वेगळ्या पानावर लेख लिहून तो कागद त्यांच्या बोलक्या छायाचित्रासोबत मुखपत्रिकेत सुटाच घालून मुखपत्रिकेच्या जनकाला अखेरचा निरोप दिला.

मी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा मुखपत्रिकेचे जनक हा एकच पैलू तुमच्यासमोर मांडला. याव्यतिरिक्त त्यांनी आपल्या समाजाच्या उन्नतीसाठी जे काही कार्य केले आहे, त्याला तोड नाही. असा हा निष्काम कर्मयोगी 'आमगेलो मनीस' त्यांच्यासारखा पुन्हा कधीही न होणे. आम्हा सर्व ज्ञातिबांधवांची भावपूर्ण श्रद्धांजली!

**– शैलजा मंगेश नाडकर्णी**
शिवाजी पार्क, मुंबई
मोबाईल नं. ९८२०१७९३८५

=:=:=:=:

## ''द–ना–'' दोन शब्दात सगळं काही

**डॉ मेधा पद्माकर दुभाषी, पुणे–९०११११६५४५**

माझी आई मूळची कारवारची, हिंदू हायस्कूलमध्ये शिकलेली. ''द–ना'' त्यांच्या वर्गात होते की आसपास, मला नक्की माहीत नाही. पण त्यांची फार चांगली ओळख आणि मैत्री होती. माझी ''द–ना''बद्दल एवढीच ओळख परंतु ते आमच्या कुटुंबाचे एक भाग झाले होते व मी त्यांना फक्त द–ना म्हणून त्यांच्याविषयी बोलते. खर तर ते वयाने मोठे, परंतु एक अस्मिता झालेली. व त्याना मुळीच खटकत नव्हते, आम्ही कोकणी भाषेत बोलत असू.

आम्ही कधी त्यांच्या घरी गेलो तर ते दिलखुलास, आत्मियतेने कारवार शाळेबद्दल, भरपूर गोष्टी बोलायचे. त्यांच्या पत्नी आमच्या चहापानची व्यवस्था करायच्या. एक–दोन तास कसे जायचे हे कधीच कळत नसे!

=:=:=:=:

## डी. एन. नावाचा ज्ञानदीप मालवला ..

महाराष्ट्रभर विखुरलेल्या कारवारी गौ.सा.ब्रा. ज्ञातिबांधवांचे एकमेव, प्रमुख केंद्रस्थान म्हणजे डी. एन. ज्ञातीतील कोणत्याही व्यक्तीविषयीची माहिती असो वा नाती, ते मिळण्याची एकमेव जागा म्हणजे डी.एन. नावाचा माहितीकोश. ज्ञातिबांधवांप्रती अंतरात जपलेले अपार प्रेम, आपुलकी आणि अभिमानापोटीच त्यांनी त्यांच्या हितकार्यात स्वत:ला झोकून घेतले होते. त्यांचं शिक्षण–पोषण कारवारलाच झालेलं असलं तरी मी त्यावेळी कदाचित जन्मलेही नसावे. त्यामुळे ओळख नव्हतीच. परंतु 'मुखपत्रिके'ने आमची 'गाठभेट' घालून दिली. माझ्या दिवंगत वडिलांवर लिहिलेला मृत्यूलेख प्रसिद्ध करण्याबाबत मी त्यांना एक विनंतिपत्र लिहीले होते. त्यांचं लगेच उलटटपाली मला गोडसं पत्र आलं होतं. हाच आमच्या ओळखीचा श्रीगणेशा, पुढे परिचय आपुलकीत, स्नेहात, आदरयुक्त मैत्रीत परिवर्तित झाला. अत्यंत बुद्धिमान, मराठी–इंग्लिश–कोकणीवर प्रभुत्व असलेले भाषाप्रभू, माणूसप्रिय, गप्पीष्ट, लाघवी असं त्यांचं गुणसंपन्न व्यक्तिमत्त्व, परंतु मोठेपणा किंवा अहंकाराला ते नेहमीच अस्पर्श राहिले. माझ्यापेक्षा वयाने, मानाने, कर्तृत्वाने, बुद्धिमत्तेने कितीतरी पटीने मोठे असलेल्या दत्ताभाऊंनी माझ्यासारख्या कारवारच्या सामान्य कन्येला पहिल्यांदाच फोन करून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या, या गोष्टीने मला त्यावेळी आनंद, आश्चर्य, संकोच या मिश्रभावनांबरोबरच भारावूनही टाकलं होतं. आपल्या गावची एक कन्या लिहिते यांचं केवढं कौतुक वाटायचं त्यांना म्हणून सांगू!

आमच्या तेलंग परिवाराचे ते खूप जवळचे स्नेही होते. माझे आजोबा, वडील आणि आई यांच्याबद्दल त्यांनी त्यांच्या लेखांत गौरवपर लिहिलेले आठवते. व्हॉट्स ॲपवर मी त्यांना पाठवलेले बीजगणितीय, भौमितीक प्रॉब्लेम्स झटक्यात सोडवून ते अचूक उत्तरं पाठवत. त्यांची या वयातही स्मरणशक्ती आणि बुद्धी वाखाणणारी होती. आमच्या तेलंग घराण्याचा ३०० वर्षांचा वंशवृक्ष त्यांनीच आम्हाला अपडेट करून दिला होता. पिढ्यान्‌पिढ्यातील पूर्वजांच्या नामावलीची गुहा उपसून वंशवृक्ष उभा करण्याचे किचकट काम दत्ताभाऊच करू जाणे!

कित्येक वर्षे मुखपत्रिकेचा धुरा सांभाळणारा हा 'ज्ञानदीप' विझल्याने मनाला जबर चटका बसलाय. त्यांच्या पुण्यात्म्यास सद्‌गती लाभलीच असेल, याबद्दल तीळमात्र शंका वाटत नाही.

– मीरा निशीथ प्रभूवेर्लेकर

=:=:=:=:=

# आपले डी एन् एन्!

१८ डिसेंबर २०२५, मार्गशीर्ष गुरुवार. हा दिवस प्रत्येक कारवारी माणसाच्या जीवनात एक दु:खदायक धक्का देण्यास कारण ठरला. आपले सर्वांचे लाडके, मुखपत्रिकेचे जुने संपादक श्री. डी. एन. नाडकर्णी (दत्तात्रय नागेश नाडकर्णी) यांचे या दिवशी निधन झाले.

ते जाण्याच्या दोनच दिवस अगोदर मी वर्धनला (डीएन पुत्र) म्हटले की मला त्यांना भेटायची तीव्र इच्छा आहे. परंतु प्रकृति अस्वास्थामुळे मला तिथे येणे शक्य नाही, तेव्हा वर्धन म्हणाला की 'व्हिडिओवर भेटा.' आणि आश्चर्य म्हणजे आम्ही एकमेकांना बघितले, बोललो. श्रवणेंद्रियाचा अडसर होता तरीही त्यांना सर्व ऐकू आले. मीही त्यांच्याशी संवाद साधला. कसलीही अडचण आली नाही. वर्धनलाही फार आश्चर्य वाटले. मी धन्य झाले. वर्धननेही त्यांची वृद्धोपकाळात उत्तम सेवा केली.

संघ व एज्युकेशन सोसायटीचा ते एक भक्कम आधारस्तंभ होते. त्यांनी अनेक देणग्या मिळवून दिल्या. सोसायटी दरवर्षी दात्यांच्या देणगीवरील व्याजातून हुशार मुलांना बक्षिसे देत असते. डी एनने बक्षिसाचा आराखडा अशा तऱ्हेने करून दिला, की काही अडचण येऊच नये. देणाऱ्याचे नाव, पत्ता, बक्षिसाची रक्कम, बक्षिसास पात्र असलेली व्यक्ती सारे काही या आराखड्यात व्यवस्थित लिहिलेले असे, यात त्यांची कल्पकता दिसून येते.

सोसायटी व संघाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत त्यांची उपस्थिती ही लक्षणीय होती. कुणाचेही मन न दुखावता, रिपोर्टमधील चुका ते निदर्शनास आणीत. तसेच चांगल्या गोष्टींचे कौतुकही करीत. मध्येच विनोदाचा शिडकावा करीत. हे त्यांच्या लोकप्रियतेचे एक गमक होते. अनेक कारवारी लोकांच्या वंशावळी ते करीत असत. ज्ञातीतील कुणी गरीब दिसला तर त्याला आर्थिक मदत करीत. तेही कुठलाही गाजावाजा न करता, ना स्वत:च्या नावाचा उल्लेख करता. हे कार्य त्यांचे शेवटपर्यंत चालू होते. कुणाचा पत्ता बदलला तर त्यासाठी आटापिटा करून त्याचा नवा पत्ता घेऊन तत्परतेने त्याला मुखपत्रिका पाठवून देत.

असे हे डी एन कारवारकरांचे एनसायक्लोपिडिया म्हटल्यास वावगे ठरणार नाही. सगळ्यांची नाती त्यांना पाठ असायची. त्यांचे मूळ गाव ठाऊक असायचे. कितीतरी नवोदित लेखकांना ते मुखपत्रिकेत लिहायला राजी करीत. कुणाच्याही कलेचे कौतुक करीत. शक्य असल्यास त्याला व्यासपीठ उपलब्ध करून देत.

असे हे लोभसववाणे, उमदे, प्रसिद्ध पराङ्मुख व्यक्तिमत्त्व पंचतत्वात विलीन झाले. ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती देवो.

मृदुला भांडारकर
मो. ९३२२२३६२५७

# आमच्या दत्तात्रयकाका नाडकर्णींच्या आठवणी

''हॅलो, विजू, आज तुगॅलो वाढदिवस, लग्नाचॉई वाढदिवस आणि दसरॉ या सगळ्यांखातेर तुमका दॉगांकई खूप खूप शुभेच्छा.'' त्यानंतरचं प्रसन्न हास्य.

दरवर्षी, वर्षानुवर्षे न चुकता येणारा दत्तात्रयकाकांचा हा फोन. आता हा आवाज मी कसा ऐकणार? माझे बाबा कै. श्री. माधव अनंत देसाई. लहानपणापासून आमच्याकडे बाबांच्या तोंडून त्यांचं नाव डी.एन्., आम्ही सतत ऐकत आलो. त्याची सवय झाली होती. बाबांच्या लेखनात दत्तात्रयकाकांना खूप रस होता. बाबांचं कारवारवर अतिशय प्रेम. खूप अभ्यास करून बाबांनी लिहिलेलं 'चित्ताकुला कारवार' ह्या पुस्तकातही दत्तात्रयकाकांचा सहभाग होता. कारण कारवार आणि कारवारकारांवर दोघांचंही अतिशय प्रेम. त्या पुस्तकाच्या प्रती आता संपल्या होत्या. बाबा आता नव्हते. पण ते पुस्तक नेहमीच सर्वांना उपलब्ध व्हावं म्हणून दत्तात्रयकाकांनी स्वत:च त्याचं पुनर्मुद्रण करून घेतलं. ग्रंथालयात त्याच्या प्रती ठेवल्या.

सांगायचं म्हणजे पार्ल्यातल्या काही मान्यवर व्यक्तींवर त्यांच्या कर्तृत्वाची समाजाने आठवण ठेवावी म्हणून कै. डॉ. रमेश प्रभू यांनी 'स्मृतिग्रंथ' म्हणून एक ग्रंथ प्रकाशित केला. त्यांनी माझ्याकडून बाबांच्यावर लेख लिहून मागितला. आमच्या लहान वयात घडलेल्या गोष्टी आम्हाला माहीत नव्हत्या. मग काय करायचं? मी दत्तात्रयकाकांना विनंती केली कारण ते सतत बाबांच्याबरोबर असत.'' ते हसले. ''तुझ्या बाबांच्यावर मी लेख लिहायचा?'' म्हटलं, ''हो. त्यांचं कार्य तुम्हाला जास्त माहीत आहे. आणि ते दुसऱ्याच दिवशी घरी आले. हा घे. तुला बाबांवर लेख हवा होता ना?'' पार्ल्यासंबंधी एक मोठं पुस्तक मेहनत घेऊन एका लेखकाने लिहिलं होतं. प्रकाशनापूर्वीच त्याच्याकडे ते त्यांनी बुक केलं होतं. वाचून झाल्यावर मला दिलं. वेदांवरही लिहिलेलं असंच मोठं पुस्तक त्यांनी घेतलं होतं. वेदांचा वारसा जपला पाहिजे ही त्यातील भावना. तेही मला दिलं. ''याचा अभ्यास तूच करशील.'' म्हणाले.

कारवारी माणसांबद्दल त्यांना अतिशय प्रेम. मला असं कळलं की काही जण त्यांना डी.एन्.एन्. न म्हणता सी.एन्.एन्. म्हणत. आणि ते बरोबरच होतं. ते स्वत: मला एकदा म्हणाले की, ''जगभरातल्या माहितीसाठी सी.एन्.एन्. आणि कारवारकारांच्या माहितीसाठी डी.एन्.एन्.'' माझी एक मैत्रीण एकदा माझ्याकडे आली होती. ती मला सहज म्हणाली, ''आशा वागळे नावाची माझी मैत्रीण इथेच एका गल्लीत राहात होती. ''काय घराचं नाव?'' ''माहीत नाही, पण तिच्या अंगणात माडाची दोन झाडं होती.'' मी दत्तात्रयकाकांना फोन केला. इतक्याच माहितीवर त्यांनी आशा वागळेचं आत्ताचं आडनाव, पत्ता, फोननंबर सर्व काही पाठवलं. खूप वर्षांनी दोन मैत्रिणी भेटल्या. काय म्हणायचं याला!

पार्ल्यातच राहात असल्याने आमच्या नेहमीच भेटी होत. इथल्या सर्व कार्यक्रमांना ते येत असत. नंतर ऐकण्याची अडचण आल्याने ते कमी झालं. आमच्या व्हॉटसॅपवर गप्पा सुरू झाल्या. अभ्यासातली काही अडचण आली की ते मला विचारत आणि कौतुकाने मला ''माझी गुरु''असं म्हणत. मी एम्.बी.बी.एस्. डॉक्टर असून संस्कृतमध्ये पीएच्.डी. केल्याचं त्यांना एवढं कौतुक होतं, संघाच्या वार्षिक कार्यक्रमात त्यांनी पुढाकार घेऊन माझा सत्कार घडवून आणला. नंतरही मला मिळालेल्या लहानसहान यशाबद्दलही ते मुखपत्रिकेत लिहीत असत.

काय आणि किती सांगायचं त्यांच्याबद्दल! संघाच्या एका पंच्याहत्तरीच्या कार्यक्रमाला हजर राहू शकले नाही तर त्यांनी दुसऱ्या दिवशी सकाळी घरी येऊन संघाच्या वतीने माझी ओटी भरली. असं कुठे कधी घडल्याचं माझ्या तरी ऐकिवात नाही! प्रसिद्ध लेखक श्री. आनंद वर्टी, दत्तात्रयकाका आणि आम्ही दोघं, कित्येक गप्पांच्या बैठकी आमच्या घरी रंगल्या आहेत. कारवारी कुटुंबांचे कुटुंबवृक्षही त्यांनी बनवले आहेत. हे काम सोपं नाही. केवळ त्यांनाच हे शक्य झालं. इतक्या वर्षांच्या सहवासाच्या इतक्या सुखद आठवणी! सांगणार तरी किती? मी त्या माझ्या मनात जपून ठेवल्या आहेत. त्यामुळे ते माझ्याबरोबर नेहमीच राहाणार आहेत. त्यांना माझा मनापासून नमस्कार.

– डॉ. आसावरी विवेक भट, विले पारले

# एक आदरणीय व्यक्तिमत्त्व

आपला समाज – गौड सारस्वत ब्राह्मण– एक फारच लहान समाज, परंतु बुद्धीने व कर्तृत्वाने फार विद्वान व आदरणीय समाज. भारतातल्या अनेक क्षेत्रांत आपल्या समाजातील अनेक नावाजलेल्या व फारच गाजलेल्या अनेक क्षेत्रात खूप जणांची विद्वत्तेत कुणाशी तुलना करता येणार नाहीत, असे फार नामांकित होऊन गेले. आणि अलीकडच्या ह्या पिढीत अतिशय आदराने जर कुणाचे नाव घ्यायचे असेल तर ते आपले श्री. दत्तात्रय नागेश नाडकर्णी, आपल्या समाजाविषयी अत्यंत कळवळ नि अभिमान असणारी एकमेव व्यक्ती म्हणजे श्री. दत्तात्रय नागेश नाडकर्णी – द. ना. नाडकर्णी.

शालेय जीवनाची सुरुवात त्यांची कारवारमधील हिंदू हायस्कूलमधून. पुढे जसे त्या काळी कारवारमध्ये महाविद्यालयाची सोय नसल्याने इतरांप्रमाणे ते सुद्धा मुंबईला गेले. आणि तेथूनच त्यांनी पुढे इंजिनीयरींग पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. आणि त्यानंतर इतर कारवारकरांप्रमाणे तेही मुंबईकर झाले. अतिशय हुशार नि तीक्ष्ण बुद्धिमत्तेची व्यक्ती. आपल्या समाजाबद्दल जाज्वल्य अभिमान.

४५ वर्षांपूर्वी त्यांनी आपल्या समाजासाठी ‘मुखपत्रिका’ ही त्रैमासिक पत्रिका सुरू केली आणि अव्याहतपणे कुठे खंड पडू न देता चालविली, त्यासाठी त्यांनी किती श्रम घेतले असतील ते त्यांनाच ठाऊक.

त्यांना कसलीही माहिती हवी असल्यास ते दूरध्वनीवरून माझ्याशी संपर्क साधत असत. हिंदू हायस्कूलचा शताब्दी महोत्सव १९९७ मध्ये जानेवारीत साजरा झाला. त्यासाठी एक महिना आधी ते कारवारमध्ये राहिले. शाळेचा संपूर्ण समारोह त्यांच्या अधिपत्याखाली झाला. त्या समारंभासाठी अव्याहतपणे काम केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली तो तीन दिवसांचा समारंभ अगदी दिमाखात व यशस्वीपणे पार पडला.

माझ्याकडून अगदी लहानसे काम जरी करून घ्यायचे असले तरी ते मला म्हणत, ‘‘This is not my request but my order to you.’’ असे हक्काने काम सांगणारी नि आपलेपणाने वागणारी अशी ही व्यक्ती आज आपल्यात नाही याचे मनस्वी दुःख होते. त्यांनी सुरू केलेली ‘मुखपत्रिका’ही अव्याहतपणे चालू रहावी हीच आपल्या समाजातर्फे त्यांना श्रद्धांजली.

अगदी हक्काने लहानसे काम का असेना मला दूरध्वनी वर सांगून ते करून घेणारे हे महान व्यक्तीमत्व आज आपल्यांत नाही ह्याचे फार वाईट वाटते. देव त्यांच्या आत्म्यास सद्गती देवो.

– शांताराम (अरुण) स. कुळकर्णी
कारवार

# कर्मयोगी दत्तात्रय काका

नमस्कार,

My sister Vrinda  M Desai mentioned the sad news about beloved Shri Dattatraya Kaka. Our heartfelt condolences to late Shri Dattatraya Kaka's family. काकांच्या आत्म्याला सद्गती आणि शांती लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना. काका खूप प्रेमळ आणि सेवाभावी होते. समाजासाठी केलेले त्यांचे कार्य फार मोठे आहे. आम्ही काकांचे ऋणी आहोत.

It is a big loss for us and our community.

नम्रता पूर्वक

गिरीश म. शानभाग आणि कुटुंबीय (USA)

## प्रकाश झोत–१

## Dr. Neeta Warty

Gynecological Endoscopic & Laparoscopic Surgeon

**Gynaec of exemplary surgical expertise from Mumbai was selected by the President at Republic day celebration.**

**Dr. Neeta Warty is a highly renowned Gynecological Endoscopic & Laparoscopic Surgeon in Mumbai India, known as a pioneer in keyhole Surgery, specializing in advanced procedures for cancers, pelvic floor repair, and uterine malformations, with over 10,000 surgeries performed, including the removal of the world's heaviest fibroid (3.4 kg.) recognized by the Guinness Book of Records. She is a leader in robotic gynecology, a trainer for other surgeons and holds significant roles at major hospitals like Reliance foundation hospital and Breach Candy Hospital.**

### *विवाह सोहळा*

**श्री. शशांक गणपती कामत, बेंगलुरु**

*यांचा विवाह*

**चि. सौ. का. अन्वीता अजित तेलंग, इर्ला, मुंबई**

**यांज बरोबर दिनांक १४ नोव्हेंबर २०२५ रोजी थाटात पार पडला**

# प्रकाश झोत–२

## भारतीय वंशाच्या गीता गंडभीर यांना दोन ऑस्कर नामांकने

## माहितीपटांच्या दिग्दर्शनात हातखंडा

अमेरिकेत राहणाऱ्या भारतीय वंशाच्या गीता गंडभीर यांना यंदाच्या ९८ व्या ॲकॅडमी पारितोषिकांमध्ये दोन ऑस्कर नामांकने जाहीर झाली आहेत. त्यांनी दिग्दर्शित केलेल्या 'द परफेक्ट नेबर' या माहितीपटासाठी एक नामांकन असून दुसरे नामांकन 'द डेव्हिल इज बिझी' या माहितीपटाच्या सहदिग्दर्शनासाठी जाहीर झाले आहे.

कथाबाह्य चित्रपट करणाऱ्या गीता गंडभीर या अमेरिकेतील बॉस्टन येथील असून त्यांचे वडील शरद गंडभीर हे १९६० च्या दशकात अमेरिकेत स्थलांतरित झाले. व्हिज्युअल आर्ट्‌समध्ये गीता यांनी हार्वर्ड विद्यापीठात शिक्षण घेतले असून कथाबाह्य चित्रपट दिग्दर्शक म्हणूनच त्यांनी आपली ओळख निर्माण केली आहे. 'द परफेक्ट नेबर' हा त्यांचा माहितीपट नेटफ्लिक्स या ओटीटी माध्यमावर प्रदर्शित झाला आहे. या माहितीपटातून त्यांनी बंदूक वापरण्याबाबतच्या अमेरिकेतील विचित्र नियमांबाबत वाचा फोडली आहे. एका काळ्या महिलेने आपल्या शेजारी राहणाऱ्या व्यक्तीच्या घराची बेल वाजवल्यानंतर तिला त्या घरातील गोऱ्या महिलेने गोळ्या घालून ठार केले होते. या घटनेवरचा हा माहितीपट आहे. 'द डेव्हिल इज बिझी' हा 'डॉक्युमेंटरी शॉर्ट' या प्रकारातील माहितीपट आहे. याचे दिग्दर्शक ख्रिस्टॅलिन हॅम्प्टन असून गीता गंडभीर या सहदिग्दर्शक आहेत. एका मुलाखतीत त्यांनी सांगितले होते की, फिल्ममेकिंग हे तंत्रज्ञानाचा वापर करून मानवाची गोष्ट सांगण्यासाठी अतिशय प्रभावी कला माध्यम आहे. जगभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्याची या माध्यमाची ताकद अतिशय प्रभावी असून याद्वारे सांस्कृतिक बंध निर्माण करण्याचा मार्ग मोकळा होतो, असे त्यांनी म्हटले होते.



रामेश्वर मंदिर

**रामेश्वर मंदिर, सरस्वती बाग, जोगेश्वरी येथे एक आठवड्यापासून चालू असलेला " शताब्दी सोहळा " दिनांक २६ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री झालेल्या " लालकी " यात्रेने यथासांग पार पडला. त्यावेळीचा रामेश्वराच्या मूर्तिच्या सजावटीचा फोटो. या वेळी जवळजवळ १ हजाराच्या संख्येने भक्तगणांनी हजेरी लावली.**

## एज्युकेशन सोसायटी – शिष्यवृत्तीसंबंधी निवेदन

एज्युकेशन सोसायटीतर्फे शालेय व महाविद्यालयीन शिक्षणासाठी आर्थिक साहाय्य दिले जाते. लाभार्थींनी अर्ज पाठविण्याची शेवटची तारीख पुढीलप्रमाणे :

| | |
|---|---|
| १ ली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी | ३० जून २०२६ |
| महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी | ३० जुलै २०२६ |

(मेडिकल व इंजिनियरिंगच्या विद्यार्थ्यांनी प्रवेशानंतर अर्ज पाठवले तरी चालतील) याशिवाय खाली नमूद केलेल्या अभ्यासासाठीही शिष्यवृत्ती देण्यात येतात. संबंधित पालकांनी व गरजू विद्यार्थ्यांनी याची कृपया नोंद घ्यावी व त्याचा पूर्ण लाभ घ्यावा, ही विनंती.

**विषय :**

- ✻ संगीत, नाटक, नृत्य
- ✻ व्यायाम, क्रीडा, गिर्यारोहण
- ✻ राज्य व राष्ट्रीय पातळीवरील परीक्षा (सी.ए. कॉस्टिंग, एन्.डी.ए. सिव्हील सर्व्हिसिंग इ.)
- ✻ संगणकावर आधारित प्रशिक्षण
- ✻ वैदिक अभ्यासक्रम, गीताभ्यास
- ✻ जर्मन, फ्रेंच इत्यादी परकीय भाषा
- ✻ शैक्षणिक सहल

दहावी–बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी खास वर्ग किंवा कोचिंग क्लासेस यासाठी लागणारा खर्च संस्थेच्या उत्पन्नानुसार देण्यात येईल व तो कार्यकारिणीच्या विचाराधीन असेल.

**गृहिणींसाठी :** गृहिणींसाठी कुठल्याही व्यावसायिक किंवा संगणक शिक्षणासाठी अर्ज करून शिष्यवृत्तीचा लाभ घेता येईल. शैक्षणिक पात्रता : बारावी.

विशेष माहितीसाठी कार्यालयात येऊन चौकशी करावी अथवा
०२२–४७४९८२५९ वर कार्यालयीन वेळात संपर्क करावा.


**नियतकालिकांच्या रजिस्ट्रेशबाबतीच्या नियमानुसार 'नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. वृत्तविलास' त्रैमासिकाचे प्रकटन**

**Form IV Rule 8**

१. **प्रकाशन स्थळ :** दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी.संघ, लक्ष्मीसदन,३६१, व्ही. पी. रोड,मुंबई ४

२. **प्रकाशन अवधी :** त्रैमासिक

३. **मुद्रक, प्रकाशक आणि संपादक :** प्रसाद मोहन कसबेकर राष्ट्रीयत्व : भारतीय
**पत्ता :** दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. संघ, लक्ष्मीसदन, ३६१, व्ही.पी. रोड, मुंबई ४

४. **मालक :** दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी. संघ, लक्ष्मीसदन, ३६१, व्ही.पी. रोड, मुंबई ४
मी प्रसाद मोहन कसबेकर या निवेदनाद्वारे जाहीर करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा आहे.

मुंबई, १ मार्च २०२६ **प्रसाद मोहन कसबेकर** – प्रकाशक

# आनंद मेळा २०२६

एन्.के.जी.एस्.बी. संघ मुंबई मंचाने दिनांक ११ जानेवारी २०२६ रोजी आनंद मेळा जोगेश्वरी येथील के.जी.एस्. सोसायटीच्या पटांगणावर आयोजित केला. या कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिक, तरुण मंडळी आणि विशेषत: लहान मुलांचीही मोठ्या प्रमाणात उपस्थिती जाणवली. सरस्वती बागेच्या या मध्यवर्ती मैदानाचा परिसर, प्रवेशद्वार सजावट, रंगबेरंगी दिवे आणि विविध प्रकारच्या स्टॉल्समुळे अतिशय आकर्षक दिसत होता. आपल्या ज्ञातीतील विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लाभल्यामुळे या कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली. एन्.के.जी.एस्.बी. बँक, सारस्वत बँक यांच्या जाहिरात प्रायोजकतेमुळे, डॉ. सतीश वाघ यांच्या सुप्रिया लाईफ सायन्स लिमिटेड तर्फे मिळालेल्या देणगीमुळे, के.जी.एस्. सोसायटीच्या परवानगीमुळे आणि मुंबई मंचच्या नियोजन कौशल्यामुळे हे शक्य झाले.

ताजे, चविष्ट, तिखट, गोड, मसालेदार, खमंग, तळलेले शाकाहारी आणि मांसाहारी खाद्य पदार्थ, नाश्ता, स्टार्टर, निरनिराळ्या पद्धतीचे फराळ, केक्स, मॉकटेल्स, सरबते, थंड व गरम पेय, कुल्फी, गृह सजावटीच्या कलात्मक वस्तू, कॉटन / ज्यूट बॅग्ज, क्रोशा विणकाम, डायरेक्ट फ्रॉम फार्म उत्पादने, आनंदवन उत्पादने, त्वचेची काळजी घेणारी उत्पादने, परफ्यूम्स, दागिने, तालवाद्ये व पुस्तके आणि गुंतवणूक सल्ला यांचा समावेश असलेली ३१ स्टॉल्सची मांडणी केली गेली. याचबरोबर जाहिरात प्रायोजक बँकेसाठीसुद्धा स्टॉल्स राखीव ठेवली होती.

उपस्थित एन्.के.जी.एस्.बी संघ, ठाणे मंच आणि मुंबई मंचचे सदस्य, मुखपत्रिकेचे संपादक, सरस्वती बाग आणि भोवतालच्या परिसरातील स्थानिक, मुंबई आणि ठाणे येथून कार्यक्रमाला हजेरी लावणाऱ्या कुटुंबांचा आणि मित्रमंडळींचा स्टॉलधारकांना उत्तम प्रतिसाद मिळाला आणि आमच्या मुंबई मंचला सर्वांनी प्रोत्साहन दिले. मुंबई मंचतर्फे प्रायोजक, देणगीदार आणि के.जी.एस. सोसायटीच्या प्रतिनिधींना पुष्पगुच्छ देऊन आभार व्यक्त केले गेले.

मोठ्या प्रमाणात उपस्थिती असूनसुद्धा संगीत धुनींच्या पार्श्वभूमीवर, आनंदमयी वातावरणात, शिस्तबद्ध आणि सुरक्षित पद्धतीने हा आनंदमेळा पार पडला.

– प्रदीप विनायक दाभोळकर – मुंबई मंच

(फोटोज् पान क्र. ३१ वर)

## Stall Holders of Anand Mela 2026

Archana Borkar
Kishor Borkar
Mann Deshi Foundation
Minakshi Phene
Seema Wagle
Jayashree Bhedasgaokar
Kalavar
Shilpa Somani
Bhakti Harchekar
Shreeja Home Flavour
Aarti Trikannad
Mrunmayi Patki
Mugdha Desai
Shreeya Gadgil
Pooja Mayekar
Panchami Vaishnav
Vidya Kasbekar
Anagha Joshi
Smruti Manjrekar
Beena Dabholkar
Devidas Shenoy
Geeta Dhotre
Anuradha Kurundwad
Priyanka Warty
Monika Sheth
Mrs Deshpande (Anandwan)
Rohidas Kunte
Ulhas Vantekar
Vijaya Pain
Nilima Manjrekar

## ठाणे मंचने आयोजित केलेली एक दिवसाची सहल
## पाटील फार्म हाऊस, शिरसाड नाका वज्रेश्वरी रोड.

रविवार, दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८ च्या दरम्यान जोगेश्वरी, ठाणे, माहिम येथून प्रत्येकी एक बस वज्रेश्वरीस जाण्यास निघाली. ठाणे बसची व्यवस्था श्री. सुरेश पालेकर यांनी, माहिम बसची व्यवस्था अरुण बोरकर व जोगेश्वरी बसची व्यवस्था आणि प्रवाशांच्या सुखसोयी श्री.प्रसाद गायतोंडे यानी पाहिल्या. त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार.

ठीक १०च्या सुमारास आम्ही (जोगेश्वरी बस) पाटील फार्म हाऊस वज्रेश्वरी रोडला पोहोचलो. आमच्या अगोदर माहिम, ठाण्याच्या बसेस आल्या होत्या. आयोजकांनी आमच्यासाठी ३ खोल्या राखून ठेवल्या होत्या. तेथे आमचे सामान ठेऊन आम्ही फ्रेश झालो.

जवळच फार्मचे दोन ओपन हॉल होते. एका हॉलमध्ये खुर्च्या व टेबले व्यवस्थित लावून ठेवली होती. सकाळचा नाश्ता तयारच होता. नाश्त्यामध्ये गोड शिरा, मिसळपाव, पोहे व गरमागरम चहा व कॉफी होती. नाश्ता चविष्ट होता. सर्वांनी त्यावर ताव मारला. आम्ही सर्व मिळून जवळजवळ १०० लोक होतो. त्यानंतर त्याच हॉलमध्ये आमचे कार्यक्रम झाले. तेथे श्री. सुरेश पालेकर ह्यांनी श्री. राजेश दिवेकर, श्री. अरुण बोरकर, श्री. गिरीश रेगे व श्री. प्रसाद गायतोंडे व इतर सर्व सभासदांची ओळख करून दिली. तसेच सहलीची उत्तम व्यवस्था केल्याबद्दल राजेश दिवेकर यांचे आभार मानले.

त्यानंतर वज्रेश्वरी देवीच्या दर्शनासाठी एक बस सोडली. आमच्यातले २०-२५ लोक तिथे गेले. विश्रांतीनंतर हॉलमध्ये करमणुकीचे कार्यक्रम चालू झाले. सर्वप्रथम श्री. देवदास अ. नाडकर्णी, कार्याध्यक्ष एज्युकेशन सोसायटी ह्यांनी एक प्रेमकविता व एक सामाजिक कविता अशा दोन कविता गाऊन दाखविल्या. त्या फारच छान होत्या. श्री. समीर देसाई यांनी इंग्लिश कविता वाचून दाखविली. त्यांनी Sunshine म्हणून इंग्लिश पुस्तक लिहिले आहे.

मेधा सोहोनी हिने ओंकारप्रधान रूप गणेशाचे हे सुंदर गाणे सादर केले. जोगेश्वरीमधील सुरसरस्वती प्रतिष्ठानचे श्री. मनोज वाघ यांनी राझ चित्रपटातील एक हिंदी गाणे आपके प्यार में अत्यंत सुंदर गाऊन दाखविले. तसेच त्यांनी माझे राणी, माझे मोगा हे मराठी गाणे छान गायीले व त्या गाण्यावर हरीश व मेधा सोहोनी यांनी Couple Dance केला. तो फारच छान झाला.

हरीश व मेधा सोहोनी यांनी एक Duet आँधीमधील इस मोडसे जाते है हे छानदार पेश केले. तसेच मेधा सोहोनीने माधुरी दिक्षितांच्या तेजाब मधले एक दोन तीन चारवर मस्त डान्स करून श्रोत्यांकडून वाहवा मिळवली. मेधाने मनोज वाघच्या साथीने आजा सनम मधुर चांदनी व हरीशच्या साथीने जीवन के हर मोड पर हे गाणे पण गायीले. प्रदीप दाभोळकर यांनी आखरी डाव मधले महंमद रफीचे तुझे क्या सुनाऊ हे गाणे आणि गुलाबी आँखे ही गाणी सुंदर आवाजात म्हटली. दिपक तेलंग (जोगेश्वरी) यांनी रीमझीम गिरे सावन फारच छान म्हटले.

संध्या वागळे पै हिने नृत्यामध्ये आपले कौशल्य दाखविले. नवराई माझी लाडाची ग व डिगी

डिगी बमबम हे तिचे दोन डान्स फार छान झाले. त्याला श्रोत्यांनी दाद दिली. ग्रुप डान्समध्ये संध्या, मेधा, हरीश यांचे कौशल्य अप्रतिम होते.

नेदरलँडहून आलेली श्री. सुरेश पालेकर यांची नात अर्पिता राव हिने पण एक सुंदर गाणे म्हटले.

आशा वाघ हिने पण दोन गाणी गायीली. मृणाल दळवी – हे आदिमा अंतीमा हे गीत गायीली.
निशा गायतोंडे – तुज मागतो मी आता हे गीत गायीली. मुक्ता कसबेकर (मालाड) डान्स 'राधा ना बोले ना बोले', तसेच मच्छिंद्र कसबेकर व मुक्ता कसबेकर Couple Danee ये मेरी झोहरा बदन वाखाणण्यासारखा होता. ज्योती सुखठणकर (ठाणे) यांनी अखेरचा तुला दंडवत व एक कोंकणी गाणे छान म्हटले. मुक्ता कसबेकर यांचा बुगडी माझी सांडली ग सातार्‍याला हा डान्स व त्याची गायिका मेधा सोहोनी यांना प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली. रेखा दाभोळकर हिने रहे ना रहे हम हे गाणे गायीले. साधारण दिड वाजता वज्रेश्वरी बस परत आली. थोड्याच वेळात सुग्रास जेवण झाले.
शाकाहारीसाठी – शेवग्याच्या शेंगाची भाजी, पनीर भाजी, वालाचे बिरडे, भाकरी, चपाती, डाळ भात, ताक गाजर हलवा.
मांसाहारींना – चिकनरस्सा, चिकन पकोडा, चपाती, भाकरी, डाळभात, सॅलड, ताक, गाजर हलवा. जेवण फारच छान होते. जेवणानंतर या सहलीत संक्रांत तिळगूळ समारंभ आयोजित केला होता. जवळजवळ ६० ते ७० स्त्रिया होत्या. त्यांना प्रत्येकीला तिळगूळ व वाण देण्यात आले. अत्यंत शिस्तबद्ध व सुरळीतपणे हा समारंभ पार पडला. तसेच पुरुषांना तिळगूळ वाटण्यात आले.

दुपारी ३ वाजता संगीतखुर्ची हा खेळ खेळण्यात आला. मिनाक्षी फेणे व अर्चना वागळे यांनी त्याची व्यवस्था केली होती.संध्याकाळी ५ वाजता चहा, कॉफी व गरमागरम मिनी बटाटेवडे ह्यांचा आस्वाद घेऊन व सहलीच्या मधुर आठवणी घेऊन परतीच्या प्रवासास सुरुवात झाली. थोडक्यात सुरक्षित व मौजमजेने भरलेली सहल असेच वर्णन करावे लागेल.

दरवर्षी सर्वांनी ठाणे मंचच्या सहलीत सहभाग घेऊन आनंद द्विगुणित करावा ही विनंती.–

उमाकांत का. पालेकर, जोगेश्वरी (पू.)–मो. ८१०८२९६९१२

(फोटोज् पान क्र. ३१ वर)

= = = = = = = = = =

आपल्या GSB ज्ञातीतील ऋषितुल्य श्री. डी. एन्. यांच्या निधनाने
आपण एक उत्तम मार्गदर्शकाला मुकलो आहोत.
त्यांना आमच्या तर्फे भावपूर्ण क्षध्दांजली !
प्रेषक : डॉ. दिलीप वागळे , श्री होमीओपथीक फार्मसी
मोबा. : ८३५६० २४५४२

## Thane Manch Managing Committee for -
## APRIL 2025 TO MARCH 2028

| Sr No. | Name | Post |
|---|---|---|
| 1. | Shri Shirish Dinanath Wagh | Chairman |
| 2. | Shri Suresh Mangesh Palekar | Vice Chairman |
| 3. | Shri Rajesh Vidyadhar Divekar | Hon. Secretary |
| 4. | Shri Girish Murlidhar Rege | Treasurer |
| 5. | Shri Arun Sadanand Borkar | Committee Member |
| 6. | Shri Abhay Shashikant Wagle | Committee Member |
| 7. | Shri Umakant Kashinath Palekar | Committee Member |
| 8. | Smt Jyoti Kiran Sukhatankar | Committee Member |
| 9. | Smt Ashwini Anand Wagh | Committee Member |
| 10. | Smt Meenakshi Prasad Phene | Committee Member |
| 11. | Smt Supriya Prasad Gaitonde | Committee Member |

***

## Managing Committee
## April 2025 To March 2028 - Mumbai Manch

| Sr. No. | Name | Post |
|---|---|---|
| 1. | Shri Shirish Dinanath Wagh | Chairman |
| 2. | Shri Mukund Anand Nadkarni | Vice-Chairman |
| 3. | Shri Amit Shrikant Wagh | Hon. Secretary |
| 4. | Shri Pradeep Vinayak Dabholkar | Treasurers |
| 5. | Shri Prasad Durganand Gaitonde | Committe Member |
| 6. | Smt. Sangeeta Deepak Kasbekar | Committe Member |
| 7. | Smt. Vandana Nikhil Sohoni | Committe Member |

=:=:=:=: =:=:=:=:

***

## नमस्कार ! नमस्कार !

**कार्यकारिणीतील सर्व सभासदांच्या माहितीसाठी........**

ठाणे मंचने रविवार, दिनांक १२ एप्रिल २०२६ रोजी मराठी गाण्यांचा कार्यक्रम आयोजित केला आहे. आपणास त्याची माहिती दिलीच आहे.

जानेवारी–मार्च २०२६ च्या मुखपत्रिकेत पान २३ वर ह्या कार्यक्रमाविषयी दिलेली माहिती आपण वाचलीच असणार.

ह्या कार्यक्रमास आणखी एक कार्यक्रम जोडला आहे त्याची माहिती ह्या मुखपत्रिकेत छापण्यात येत आहे.

ठाणे मंच आयोजित लोकप्रिय मराठी गीतांच्या सादरीकरणाबरोबरच **गोव्यातील प्रसिद्ध लेखिका मीरा प्रभुवेर्लेकर (पूर्वाश्रमीच्या तेलंग) यांच्या सातव्या ललित लेख संग्रहाचे प्रकाशन एन्.के.जी.एस्.बी. बँकेच्या अध्यक्षा मा. हेमांगी नाडकर्णी यांच्या शुभ हस्ते करण्यात येईल.**

**तारीख : रविवार, दिनाक १२ एप्रिल २०२६**

**स्थळ : तेंडूलकर हॉल, माहीम**

**वेळ : सकाळी १० ते २**

**बस व्यवस्था केली आहे.**

**आपले नम्र :**

**सुरेश पालेकर, राजेश दिवेकर, गिरीश रेगे**

## चुकीची दुरुस्ती

१) एज्युकेशन सोसायटीने नमूद केल्याप्रमाणे जानेवारी ते मार्च’२६च्या मुखपत्रिकेमध्ये पान नंबर ६ सिरियल नंबर १मधील सानवी सज्जन सुखठणकर हिला SSLC मध्ये ९७.८% असे चुकीचे दाखवले गेले आहे ते खरे तर ९९.४% आहेत असे वाचावे. धन्यवाद.

२) जानेवारी ते मार्च’२६च्या मुखपत्रिकेच्या संपादकीय लेखात कार्यकारिणी निवडीमध्ये ज्वॉइंट सेक्रेटरी असे दोनदा नमूद केले आहे ते दोन्ही ‘हॉनररी सेक्रेटरी’ असे वाचावे. धन्यवाद.

३) संघ पूर्वाध्यक्ष मारुती दळवींची कारकिर्द तारीख १० ऑक्टोबर २०२५ च्या ऐवजी २७ सप्टेंबर २०२५ असे वाचावे.

# पुण्यस्मरण

**वडिल**



**श्री सदानंद शिवराव वागळे**
देवाज्ञा २३-०४-१९९५

**आई**



**श्रीमती कमला सदानंद वागळे**
देवाज्ञा १०-०६-२०१६

*जीवनाचा खडतर प्रवास तुम्ही कष्टाने गाजविला,*
*आमचा प्रत्येक क्षण तुम्ही निस्वार्थी प्रेमाने सजवीला,*
*साक्षात्कारी जीवनाचा आदर्श तुम्ही जिद्दीने नांदविला,*
*धन्य आहोत आम्ही आम्हांस तुमचा सहवास लाभला.*

**- विजय सदानंद वागळे,**
**ठाणे (प)**
**९२२१६ ०७५७७**

## संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या
## (मागील अंकानंतर )
## उल्लेखनीय देणग्या

### १) श्री. शरद नागेश सलगर यांच्या नावे
### रुपये १,५३,००३ देणगी

सदाशिवगड माध्यमिक शाळेचे लोकप्रिय मुख्याध्यापक सलगर मास्तर यांचे चिरंजीव व टांझानिया येथे ३५ वर्षे वास्तव्य करून नाव लौकिकास आलेले श्री. शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती रेखा सलगर प्रतिवर्षी सातत्याने समाजसेवा निधीसाठी, वृद्ध सेवा निधी साठी व एज्युकेशन सोसायटीसाठी प्रत्येकी रुपये ५१००१ या प्रमाणे १,५३,००३ रुपयांच्या देणग्या देतात. यंदा ही त्यांनी अशाच देणग्या दिल्या आहेत.

### २) श्री. निशिकांत लजपत नाडकर्णी यांच्या नावाने
### रुपये २ लाखांची देणगी

अंधेरी येथे राहणारे श्री. निशिकांत लजपत नाडकर्णी यांचे नुकतेच अल्पशा आजाराने ऑक्टोबर २०२५मध्ये निधन झाले. ते महिंद्रा अँड महिंद्रामध्ये उच्च पदावर अधिकारी होते. कारवार विषयी आत्यंतिक प्रेम, बॅडमिंटनपटू, अतिशय शांत, प्रेमळ, परोपकारी व दानशूर स्वभाव ही त्यांची वैशिष्ट्ये. त्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या पत्नीने व कन्येने वृद्ध सेवेस रुपये ५०००० व विवाहित कन्येने रुपये ५०००० देणगी दिली आहे. त्याच प्रमाणे अमेरिकास्थित कन्येने एज्युकेशन सोसायटीसाठी रुपये १ लाखाची देणगी दिली आहे.

### ३) श्री. महाबळेश्वर विनायक तेलंग यांच्या स्मरणार्थ वृद्ध सेवेला
### रुपये २ लाखांची देणगी

श्री महाबळेश्वर विनायक तेलंग (म्हाबळूमाम म्हणून ते लोकप्रिय होते) हे स्व. श्री. गजानन नारायण  नाडकर्णी यांचे आजोबा आणि स्व. श्री. एन्. टी. नाडकर्णी (अंकोला) यांचे सासरे होते. ते एक मोठ्या मनाचे, परोपकारी, विचारवंत समाजसुधारक आणि २० व्या शतकाच्या सुरुवातीच्या दशकात धारवाड येथील एन्.के.जी.एस्.बी. समुदायाचे आदरणीय सदस्य होते. त्यांनी ए. जी.च्या कार्यालयात असताना निर्माण झालेल्या संबंधांचा वापर करून एन्.के.जी.एस्.बी. समुदायाच्या अनेक सदस्यांना मुंबईत नोकऱ्या देऊन मदत केली आणि मुंबईत स्थायिक होईपर्यंत त्यांच्या कुटुंबीयांनाही अन्न, निवारा आणि शिक्षण देऊन मदत केली. त्यांनी पुनर्विवाहाला प्रोत्साहन व आपल्या समाजात महिला सक्षमीकरण व सामाजिक बदल घडवून आणण्यासाठी योगदान दिले.

अशा ह्या आजोबांच्या नावे श्री. गजानन(देविदास)नारायण नाडकर्णी यांच्या तर्फे श्री. विनय नाडकर्णी यांनी वृद्धसेवेसाठी रुपये २ लाखांची देणगी दिली आहे.

## संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती यमूताई, श्रीमती सपाताई व श्रीमती सिंधूताई यांच्या स्मरणार्थ श्री. मंगेश शंकर बोरकर यांजकडून | ३,००३ |
| २. | श्री. रमाकांत भवानीराव बोरकर यांच्या २९ व्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री. अजित यांजकडून | ४,००० |
| ३. | श्री. किशोर सर्वोत्तम हिचकड यांजकडून | २,००० |
| ४. | श्री. दत्तात्रय नागेश नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ बंधू श्री. जयंत नागेश नाडकर्णी यांजकडून | १८,००० |
| ५. | श्री. मंदार जयप्रकाश देसाई व श्रीमती मधुरा पवन पै यांजकडून | ५,००० |
| ६. | श्री. शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती रेखा यांजकडून | ५१,००१ |
| ७. | श्री. दत्तात्रय नागेश नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ अनामिकाकडून | १,००१ |
| ८. | श्री. सदानंद गणपत नाडकर्णी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त व श्रीमती इंदू सदानंद नाडकर्णी यांच्या वाढदिवसाच्या स्मरणार्थ अनामिकाकडून | ५,१११ |

## वृद्ध सेवा निधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. महाबळेश्वर (म्हाबळूमामा) विनायक तेलंग यांच्या स्मरणार्थ कै. श्री. गजानन (देविदास) नारायण नाडकर्णी यांच्यातर्फे श्री. विनय नाडकर्णी यांजकडून | २,००,००० |
| २. | श्री. अनिल भालचंद्र तेलंग यांच्या वाढदिवासाच्या स्मरणार्थ पुत्र श्री. पराग यांजकडून | ३०,००० |
| ३. | श्री. कमलाकर यशवंत तेलंग यांच्या पुण्यतिथिनिमित्त पत्नी श्रीमती सुरेखा यांजकडून | ५,१०० |
| ४. | श्री. निशिकांत लजपत नाकडर्णी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती उषा व कन्या श्रीमती वैशाली यांजकडून | ५०,००० |
| ५. | श्री. निशिकांत लजपत नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती अनिता सुनील प्रभू यांजकडून | ५०,००० |
| ६. | श्री. शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती रेखा यांजकडून | ५१,००१ |
| ७. | वडिल श्री. गजानन सीताराम बोरकर व आई श्रीमती विमल यांच्या स्मरणार्थ श्री. सीताराम व दिपक गजानन बोरकर यांजकडून | १०,००० |

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. रमाकांत भवानीराव बोरकर यांच्या २९व्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री. अजित यांजकडून | २,००१ |
| २. | श्री. निशिकांत लजपत नाकडर्णी यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती संगिता अमर लाड व नात कुमारी प्राची अमर लाड यांजकडून | १,००,००० |
| ३. | श्री. मंदार जयप्रकाश देसाई व श्रीमती मधुरा पवन पै यांजकडून | ५,००० |
| ४. | श्री. दत्तात्रय नागेश नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ श्री. देवदास अनंत नाडकर्णी यांजकडून | १०,००० |
| ५. | श्रीमती विद्या बाळगोपाळ आचार्य यांच्या जन्मशताब्दीनिमित्त कन्या श्रीमती उल्का चंद्रशेखर कुळकर्णी यांजकडून | १०,००० |
| ६. | श्री. शरद नागेश सलगर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती रेखा यांजकडून | ५१,००१ |

**११.१.२६च्या आनंद मेळ्यासाठीच्या मुंबई मंचला देणग्या :**

| | |
|---|---|
| १) डॉ. सतीश वामन वाघ – | २,००,००० |
| २) श्री. शिरीष दीनानाथ वाघ – | १०,००० |
| ३) श्रीमती नंदिता वाघ – | ५,००० |

**स्पॉन्सरशिप्स**

| | |
|---|---|
| १) NKGSB Bank - | २५,००० |
| २) सारस्वत बँक – | २५,००० |
| ३) SVC Bank (banner display) | ५,००० |

## ।। कालाय तस्मै: नम: ।।

| | नाव | सध्याचे ठिकाण |
|---|---|---|
| १. | श्री दत्तात्रेय नागेश नाडकर्णी | पारले |
| २. | श्री. शैलेश दामोदर नाडकर्णी | ताडदेव |
| ३. | श्री. दुर्गानंद गिरी नाडकर्णी | लातूर |
| ४. | श्री. राजीव श्रीपाद पिकळे | कारवार |
| ५. | श्री. अनिल विठ्ठल बोरकर | पारले |
| ६. | डॉ. श्री. मिलिंद वसंत तेलंग | पुणे |
| ७. | श्री. पद्माकर श्रीपाद तेलंग | वांद्रे |
| ८. | डॉ. अविनाश गोपाळ वागळे | ठाणे |
| ९. | श्रीमती शैलजा (वासंती) देविदास बोरकर | अंधेरी |
| १०. | श्रीमती सरोज दिपक खारकर (पूर्वाश्रमीच्या सरोज देवीदास कसबेकर) | विरार |
| ११. | श्री. कृष्णा सर्वोत्तम हिचकड | मडगांव (गोवा) |



मुंबई मंचतर्फे आयोजित दिनांक ११ जानेवारी २०२६ रोजी सरस्वती बाग, जोगेश्वरी येथे संपन्न झालेल्या ‘आनंद मेळ्याचे’ फोटो.



मुंबई मंचतर्फे आयोजित दिनांक ११ जानेवारी २०२६ रोजी सरस्वती बाग, जोगेश्वरी येथे संपन्न झालेल्या ‘आनंद मेळ्याचे’ फोटो.



दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी मंचतर्फे संपन्न झालेल्या सहलीचे फोटो



दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी सहलीसह ठाणे मंचने तिळगुळसमारंभ साजरा केला त्याचे फोटो




ठाणे मंचचे उपाध्यक्ष श्री. सुरेश पालेकर यांच्या विवाहाला ७ फेब्रुवारी २०२६ रोजी ५० वर्षे पूर्ण झाली त्यावेळी त्यांच्या पत्नी श्रीमती सुरेखा समवेतचा फोटो




पणजी येथे ‘गोवा बुक फेस्टीव्हल २०२६’ हा कार्यक्रम दिनांक ६ फेब्रुवारी २०२६ रोजी संपन्न झाला. त्या सोहळ्याचे वेळी गोव्याची ख्यातनाम लेखिका श्रीमती मीरा प्रभू वेर्लेकर यांना प्रशंसापत्र देऊन गौरविण्यात आले त्याचा फोटो

Regd. with register of Newspapers of India under Reg. No. RN37436/80




हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक प्र. मो. कसबेकर यांनी दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.